# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.01.2025** **वारःबुधवार**

---

1. आंध्र प्रदेशात पंतप्रधानांच्या हस्ते आज विविध विकास कामांचं लोकार्पण, उद्घाटन आणि पायाभरणी
2. ब्रह्मपुत्रेवर महाकाय धरणाच्या चीनच्या योजनेविषयी केंद्र सरकार सतर्क असल्याची संरक्षण मंत्र्यांची ग्वाही
3. 18 वं प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं आजपासून भुवनेश्वर इथं आयोजन
4. सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर 6 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा सांख्यिकी मंत्रालयाचा अंदाज
5. मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत ट्रीसा जॉली -गायत्री गोपीचंद यांचा अंतिम सोळामध्ये प्रवेश आणि
6. नेपाळमधील भूकंपातल्या मृतांच्या संख्येत वाढ

**<u>पंतप्रधान-आंध्रप्रदेश</u>**

आंध्र प्रदेशात विशाखापट्टणम् इथं आज पंतप्रधानांच्या हस्ते विविध विकासकामांचं लोकार्पण, उद्घाटन तसंच पायाभरणी होणार आहे. एकंदर दोन लाख कोटींहून अधिक किंमतीच्या या प्रकल्पांमध्ये पुडीमाडाका इथल्या राष्ट्रीय हरित हायड्रोजन मोहिमेअंतर्गत पहिल्या हरित हायड्रोजन हबचा समावेश आहे. त्यासाठी अंदाजे 1 लाख 85 हजार कोटी गुंतवणूक केली जाणार आहे. यामुळे पुढील पाच वर्षात भारताचं पाचशे गिगावॅट अजीवाश्म ऊर्जा क्षमता गाठण्याची लक्ष्यपूर्ती होणार आहे.

पंतप्रधानांच्या हस्ते, साडे एकोणीस हजार कोटी रुपये मूल्यांच्या विविध रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांचं उद्घाटन तसंच लोकार्पण होणार आहे. तसंच दक्षिण कोस्ट रेल्वे मुख्यालय, नक्कापल्ली इथं बल्क ड्रग पार्कची पायाभरणी करणार आहे. या ड्रग पार्कमुळे रोजगार निर्मिती आणि विकासाला चालना मिळणार आहे. तर कृष्णपट्टमणम् औद्योगिक परिसराची पायाभरणीही पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात येईल. हा प्रकल्प अंदाजे साडेदहा हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचा आणि एक लाख प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

**<u>राजनाथ-धरण</u>**

भारताच्या सीमेला लागून तिबेटमध्ये ब्रह्मपुत्र नदीवर चीनकडून महाकाय धरण बांधण्याच्या योजनेविषयी केंद्र सरकार सतर्क असल्याची ग्वाही संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दिली आहे. देशाचं हितसंबंधांचं रक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनाही करत राहील असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आग्रा इथं स्पष्ट केलं. चीनने नुकतेच ब्रह्मपुत्रेवर धरण बांधण्याची योजना जाहीर केली आहे. ब्रह्मपुत्रेच्या खालील भागातल्या राज्यांना यामुळे हानी पोहोचणार नाही याची काळजी घेण्याचं आवाहन सरकारनं चीनला केलं आहे.

**<u>प्रवासी भारतीय दिन</u>**

18 व्या प्रवासी भारतीय दिनाच्या संमेलनाला आजपासून भुवनेश्वर इथं सुरुवात होत आहे. यासाठी 50 देशांतून भारतात येणाऱ्या अनिवासी भारतीयांसमोर ओडिशा राज्याच्या समृद्ध संस्कृतीचं आणि वारशाचं प्रदर्शन मांडण्यात आलं आहे. ओडिशा सरकारने युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालयाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या युवा प्रवासी भारतीय दिन कार्यक्रमाने संमेलनाची सुरुवात होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, तर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू शुक्रवारी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी असतील. विविध क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत राष्ट्रपती, परदेशी भारतीय समुदायातील लोकांना प्रवासी भारतीय सन्मान प्रदान करतील. यंदा 'विकसित भारतासाठी भारतीय समुदायाचं योगदान'

ही मुख्य संकल्पना ठेवण्यात आली आहे. या विषयावरील आवृत्तीच्या प्रमुख पाहुण्या त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या अध्यक्षा क्रिस्टीन कार्ला कांगालू अधिवेशनाला व्हर्च्युअल पद्धतीने संबोधित करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीतील निजामुद्दीन स्थानकातून सुटणाऱ्या प्रवासी भारतीय एक्स्प्रेस या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवतील. ही गाडी तीन आठवड्यांसाठी विविध ठिकाणी प्रवास करणार आहे.

**<u>जयशंकर-ओडिशा, प्रवासी भारतीय दिवस</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर कालपासून पाच दिवसांच्या ओडिशा दौऱ्यावर असून, त्यांनी ओडिशाच्या पुरी आणि भुवनेश्वर इथल्या विविध पर्यटनस्थळांना भेटी दिल्या. जयशंकर यांनी कोनार्कच्या सूर्य मंदीर, जगन्नाथ मंदीर, धौली शांती स्तूप तसंच भुवनेश्वर इथं 11 व्या शतकातल्या लिंगराज मंदिरालाही भेट दिली. भुवनेश्वर इथं होणाऱ्या 18 व्या प्रवासी भारतीय दिवस अधिवेशनाला ते आज उपस्थित राहाणार आहेत.

**<u>सकल उत्पादन वाढ</u>**

देशाचं 2024-25 या आर्थिक वर्षासाठीच्या देशांतर्गत सकल उत्पादन वाढीचा दर सहा पूर्णांक ४ दशांश टक्के राहिल असा प्राथमिक अंदाज सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं व्यक्त केला आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयानं काल याबाबतची आकडेवारी प्रसिद्धी केली. त्यानुसार देशांतर्गत राष्ट्रीय उत्पादनात 9 पूर्णांक 7 दशांश टक्के वृद्धी दिसून आली आहे. कृषी आणि संबंधित क्षेत्रांमध्ये ही वाढ 3 पूर्णांक 8 दशांश टक्के झाली आहे. बांधकाम क्षेत्र, वित्तीय, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा क्षेत्रातही सात पूर्णांक 3 टक्के वाढ अपेक्षित आहे.

**<u>नवीन दिनदर्शिका</u>**

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते काल दिल्लीत केंद्र सरकारच्या नव्या वर्षाच्या दिनदर्शिकेचं उद्घाटन करण्यात आलं. परिवर्तनवादी प्रशासनाच्या तत्वांना अधोरेखित करणारी जनभागीदारी से जनकल्याण ही नव्या दिनदर्शिकेची संकल्पना आहे. गेल्या दशकभरात विविध क्षेत्रात परिवर्तनात्मक प्रशासनाच्या दृश्य प्रभावावर या दिनदर्शिकेत प्रकाश टाकण्यात आल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. यावेळी माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरूगन, माहिती प्रसारण सचिव संजय जाजू आदी मान्यवर उपस्थित होते.

**<u>गडकरी-रस्ते सुरक्षा</u>**

केंद्रीय रस्ते वाहातूक आणि महामार्ग मंत्री नीतीन गडकरी यांनी वाहनचालकांच्या प्रशिक्षणासाठी देशभरात वाहनचालक प्रशिक्षण संस्था स्थापन करायला प्रोत्साहन देण्यासाठी एक योजना आणणार असल्याची माहिती गडकरी यांनी काल वार्ताहरांशी बोलताना दिली. त्याअंतर्गत ड्रायव्हर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन तसंच स्वयंचलित चाचणी स्थानक उभारण्यासाठी एकात्मिक पायाभूत सुविधांसाठी प्रोत्साहन दिले जाईल. असंही ते म्हणाले. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या परिवहन मंत्र्यासमवेत झालेल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

**<u>इस्रो</u>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था-इस्रोचे  नवे अध्यक्ष आणि अंतराळ विभागाचे सचिव म्हणून व्ही नारायणन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. इस्रोचे सध्याचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांच्याकडून 14 जानेवारी रोजी नारायणन पदभार स्वीकारतील. नारायणन सध्या केरळमधील वालियामाला इथल्या इस्रोच्या एलपीएससी म्हणजे लिक्विड प्रोपल्शन सिस्टीम सेंटरचे संचालक असून रॉकेट आणि अंतराळयान यांचा दीर्घ अनुभव असलेले ते एक प्रतिष्ठित शास्त्रज्ञ आहेत.

**<u>प्रदर्शन</u>**

नोएडा इथल्या इंडिया एक्स्पोझिशन मार्टमध्ये आजपासून इंडसफूड 2025 हे 'शेतातून थेट ताटात' या संकल्पनेवर आधारित फार्म-टू-फोर्क हे व्यापार प्रदर्शन सुरु होत आहे. तीन दिवसांच्या या प्रदर्शनाचं उद्घाटन केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. इंडसफूड 2025 हे आशिया खंडातील सर्वात मोठं वार्षिक खाद्य-पेय व्यापार प्रदर्शन असून यात 30 पेक्षा जास्त देशातील 2300 हून अधिक प्रदर्शक एकत्र येत आहेत.

**तेलुगू परिषद**

आंध्र प्रदेशातील राजामहेंद्रवरम इथल्या गोदावरी ग्लोबल विद्यापीठात आजपासून जागतिक तेलुगू परिषदेला सुरुवात होत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत प्रसिद्ध तेलगू लेखक, साहित्यिक, तसंच माजी उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू; भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती एन व्ही रमण; दोन्ही तेलगू राज्यांचे राज्यपाल; केंद्र आणि राज्याचे मंत्री, खासदार, कलाकार आणि अभिनेते सहभागी होणार आहेत.

**फूटबॉल**

फुटबॉलमध्ये भारतीय साखळी सामन्यांच्या 16 व्या सप्ताहाला आजपासून सुरुवात होणार आहे. आजचा सामना एफसी गोवा आणि हैदराबाद एफसी यांच्यात होणार आहे.

**हॉकी**

हॉकीच्या साखळी सामन्यांमध्ये वेदांत कलिंगा लान्सर्सने श्राची रारह बेंगाल टायगर्सचा 6-0 ने पराभव केला. लान्सर्साठीच्या कृष्ण बहादूर पाठकला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं. आज टीम गोनासिका चा सामना तामिळनाडू ड्रॅगन्सशी होणार आहे. तर दुसरा सामना युपी रुद्रस आणि हैदराबाद तुफान्स यांच्यात होणार आहे.

**खोखो विश्वचषक**

खो खो विश्वचषक 2025 स्पर्धा येत्या 13 ते 19 जानेवारी दरम्यान दिल्ली होणार आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या पाठिंब्याने होणाऱ्या या स्पर्धेत 20 पुरूष आणि 19 महिला संघ सहभागी होणार आहेत.

**मलेशिया बॅडमिंटन**

मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी महिला दुहेरीच्या पहिल्या फेरीतल्या सामन्यात थायलंडच्या जोडीचा 21-10, 21-10 पराभव केला आणि अंतिम सोळामध्ये प्रलेश मिळवला. तर लक्ष्य सेनला चीन तैपेईच्या खेळाडूकडून पराभव स्विकारावा लागल्यानं तो स्पर्धेबाहेर पडला. आज मालविका बनसोडचा सामना मलेशियाच्या खेळाडूशी होणार आहे. आकार्षी कश्यपचा सामना डॅनिश शटलर ज्युली जेकोबसेनशी, अनुपमा उपाध्यायचा सामना थायलंडच्या पोर्नपावी चोचुवाँगशी होणार आहे.

**नेपाळ भूकंप**

नेपाळ आणि तिबेटच्या सीमावर्ती भागात काल झालेल्या भुकंपातील मृतांची संख्या 126 वर पोहोचली आहे. चीनच्या अधिकृत सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काल सकाळी झालेल्या 7 पूर्णांक 1 रिख्टर पातळीच्या या भूकंपामध्ये 188 लोक जखमी झाले. भूकंपाचे केंद्र तिबेटच्या स्वायत्त प्रदेशातील झिझांग इथं होतं. इथं मालमतेचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचं सुत्रांनी स्पष्ट केलं आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.